महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ ची राज्यातील नागरी स्थानिक संस्थांमध्ये अंमलबजावणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन आदेश क्रमांक: संकिर्ण- २०१५/प्र.क्र.३९८/नवि-२०
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- २० जानेवारी, २०१६

वाचा:- शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४, दि.२३ जून, २०१५.

शासन आदेश:-

शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४, दिनांक २३ जून, २०१५ अन्वये विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील नागरी स्थानिक संस्थांनी महाराष्ट्र लोकसेवा अध्यादेश-२०१५ मधील कलम-३ अनुसार अधिसुचित करावयाच्या सेवांबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशानुसार राज्यातील महानगरपालिकांनी कलम-३ नुसार एकूण १५ सेवा व नगरपरिषदा/नगरपंचायती यांनी एकूण १३ सेवा अधिसुचित करावयाच्या आहेत. त्यानुसार राज्यातील नागरी स्थानिक संस्थांनी संबंधित सेवा अधिसुचित केल्या आहेत.

२. उपरोक्त अधिनियमानुसार अधिसुचित केलेल्या सेवा ऑनलाईन पद्धतीने सर्वसाधारण जनतेस उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रथमत: राज्यातील ४३ अमृत शहरातील सेवा दिनांक २६ जानेवारी, २०१६ पासून ऑनलाईन पद्धतीने देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने सदरहू सेवा ऑनलाईन पद्धतीने देण्याकरिता फायरवॉल, एसएमएस गेटवे, पेमेंट गेटवे, ई-मेल सर्विसेस इ. कार्यान्वित करण्याकरिता संबंधित नागरी स्थानिक संस्थांनी कार्यवाही करावी.

३. उपरोक्त पैकी फायरवॉल Director General of Supplies & Disposals (DGS & D) या केंद्र शासनाच्या आदेशानुसार दर करार पद्धतीने (न्युनतम किंमतीची) खरेदी करण्यात यावी. त्याचप्रमाणे सदरहू खरेदी ही दर करार पद्धतीने करण्याकरिता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम-९३ (८) नुसार मान्यता देण्याच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही करावी.

४. उपरोक्त सेवा दिनांक २६ जानेवारी, २०१६ पासून ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही होण्याच्या अनुषंगाने लोकसेवा हमी कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्समधील अधिकाऱ्यांकडे सोबतच्या प्रपत्रानुसार त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये विहित मुदतीत अंमलबजावणी करून घेण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१६०१२०१६४५४७३७२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2016.01.20 16:58:58 +05'30'

(ज. ना. पाटील)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रती-

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव.
२. मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव.
३. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
४. सर्व विभागीय आयुक्त.
५. सर्व जिल्हाधिकारी.
६. राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
७. राज्यातील सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती यांचे मुख्याधिकारी.
८. संबंधित अधिकारी.
९. नगर विकास विभागातील सर्व कार्यासने.
१०. निवडनस्ती.

RTS Online Servcies करिता संपर्क अधिकारी			
Sr.No	**Name of Urban Local Body**	**Vendor**	संपर्क अधिकारी
A	**Pune Division**		
1	Pune Municipal Corporation	Probity	श्री. उदय टेकाळे उपआयुक्त, पुणे महानगरपालिका
2	Satara	ABM	
3	Solapur Municipal Corporation	ABM	
4	Barshi Municipal Council	ABM	
5	Ichalkaranji Municipal Council	ABM	
6	Pimpri Chinchwad Municipal Corporation	Probity	
7	Kolhapur Municipal Corporation	HCL Info	
8	Sangli Miraj Municipal Corporation	HCL Info	
B	**Nashik Division**		
1	Nashik Municipal Corporation	Zensar	श्री. गणेश शिंदे मुख्याधिकारी राहुरी नगरपरिषद
2	Ahmednagar Municipal Corporation	ABM	
3	Dhule Municipal Corporation	ABM	
4	Malegaon Municipal Corporation	ABM	
5	Bhusaval Municipal Council	ABM	
6	Nandurbar Municipal Council	ABM	
7	Jalgaon Municipal Corporation	STPI	
C	**Nagpur Division**		
1	Chandrapur Municipal Corporation	Local vendor	श्री. अनिल मुळे उप संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई
2	Gondia Municipal Council	ABM	
3	Wardha Municipal Council	ABM	
4	Nagpur Municipal Corporation	CMC	
5	Hingan Ghat Municipal Council	ABM	
D	**Aurangabad Division**		
1	Aurangabad Municipal Corporation	ABM	श्री. यशवंत डांगे मुख्याधिकारी फलटन नगरपरिषद
2	Jalna	ABM	
3	Latur Municipal Corporation	ABM	
4	Udgir Municipal Council	ABM	
5	Beed Municipal Council	ABM	
6	Osmanabad Municipal Council	ABM	
7	Parbhani Municipal Corporation	ABM	
8	Nanaded Waghela Municipal Corporation	Vayamtech & Elbiz	
E	**Amravati Division**		
1	Amravati Municipal Corporation	ABM	श्री. गणेश शेटे मुख्याधिकारी लोणावळा नगरपरिषद
2	Akola Municipal Corporation	ABM	
3	Achalpur Municipal Council	ABM	
4	Yavatmal Municipal Council	ABM	
F	**Konkan Division**		
1	Municipal Corporation of Greater Mumbai	ABM	श्री. संजय शिंदे सहाय्यक आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका
2	Kalyan Dombivli Municipal Corporation	ABM	
3	UlhasNagar Municipal Corporation	ABM	
4	Bhiwandi Nizampur Municipal Corporation	ABM	
5	Kulgaon Badlapur Municipal Council	ABM	
6	Panvel Municipal Council	ABM	
7	Ambarnath Municipal Council	ABM	
8	Thane Municipal Corporation	Probity	
9	Navi Mumbai Municipal Corporation	MARS	
10	Mira Bhayander Municipal Corporation	IndicTrans	
11	Vasai Virar Municipal Corporation	Local vendor	